# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
**परभणी-431402(महाराष्ट्र) भारत**

Vasantrao Naik Marathwada Krishi vidyapeeth

**Parbhani-431 402 (Maharashtra) India**

---

संदर्भ :- १. शासन परिपत्रक , सामान्य प्रशासन विभाग, समय/२०२०/प्र.क्र.३१/१८ दि.१६/०३/२०२०.
२. विद्यापीठ परिपत्रक क्र.एपीआर-२ २०२० दि.१६/०३/२०२०.

**बायोमॅट्रिक उपस्थिती कार्यान्वित करण्या बाबत.**

## परिपत्रक

जा.क्र.समय/२०२०/बायोमॅट्रिक/प्र.क्र.२८५/आस्था-७
दिनांक :- २९ /०९ /२०२०.

प्रकरणी, संदर्भीय क्र.२ च्या परिपत्रकानुसार विद्यापीठातील अधिकारी / कर्मचारी यांना बायोमेट्रिक उपस्थिती नोंदविताना कोरोना विषाणूची लागण होवू नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बायोमेट्रिक उपस्थिती नोंदविण्यास स्थगिती देण्यात आली होती.

आता, या आदेशाव्दारे विद्यापीठाअंतर्गत सर्व कार्यालयामध्ये कोरोना विषाणूची लागण होवू नये यासाठी प्रतिबंधात्मक खबरदारीचे उपाय म्हणून सॅनिटायझरचा वापर अनिवार्य करुन बायोमेट्रिक उपस्थिती दि. ०१ ऑक्टो. २०२० पासून कार्यान्वित करण्यात यावी. दि.०१ ऑक्टो, २०२० पासून केवळ बायोमेट्रिक उपस्थिती आधारेच वेतन देयके स्विकारले / अदा केले जातील. त्यामुळे उपरोक्त सूचनांचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

कुलगुरु यांच्या मान्यतेने..

**कुलसचिव**

**प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता(कृषि) /संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण/नियंत्रक/विद्यापीठ अभियंता, वनामकृवि परभणी यांना त्यांच्या अधिनस्त यंत्रणांना सूचित करण्यासाठी अग्रेषित.
२. सर्व कार्यालय प्रमुख, यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
३. नियंत्रक,वनामकृवि,परभणी यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी केवळ बायोमॅट्रिक उपस्थिती विचारात घेऊनच वेतन देयके स्विकारावीत प्रकरणी उपरोक्त निर्देशानुसार उचित कार्यवाहीस्तव.
४. प्रभारी अधिकारी तथा नोडल ऑफीसर,मध्यवर्ती संगणक केद्र, वनामकृवि परभणी यांना देवुन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
५. मा.कुलगुरु यांचे खाजगी सचिव यांना माहीतीस्तव.